अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail :
addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक २८/०३/२०२४

-: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | गुन्हा रजि.नं. ११/२०२४ |
| कलम | ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आलोसेचे नाव व कार्यालय | १) निलेश गजानन शिंदे, पो.शि.क्र. १४०७९३,<br>२) साहेबराव दत्ताराम जाधव, पो.ह.क्र. ०३१०८ सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई |
| लाचेची मागणी | रु. ६,०००/- रुपये तडजोडी अंती रू. ५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ५,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नी व मुलाचे पासपोर्ट काढण्याकरीता अर्ज सादर केला होता. सदर पासपोर्ट संदर्भात पडताळणी करण्याकरीता त्यांना सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणेस बोलविण्यात आले होते. दिनांक २२/०३/२०२४ रोजी तक्रारदार यांनी पोलीस ठाणेस जावून पडताळणीकरीता आवश्यक असलेल्या संबंधित कागदपात्रांची पुर्तता केली होती. नमूद कागपत्रांची पडताळणी केली असता, तक्रारदार यांची पत्नी व मुलगा हे आधारकार्डवर नमूद पत्त्यावर रहत नसल्याने, नमूद पत्त्यावर ते रहत असल्याचे दाखवून पडताळणी कार्यवाही पुर्ण करण्यासाठी उपरोक्त नमूद लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांचेकडे रू. ६,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २६/०३/२०२४ रोजी लाप्रवि, वरळी कार्यालयास येवून लेखी तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ यांनी तडजोडी अंती रू. ५,०००/- इतक्या रक्कमेच्या लाचेची पंचासमक्ष मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २७/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांनी सांगितलेप्रमाणे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम आलोसे क्र.१ यांच्या टेबलाच्या ड्रावर मध्ये ठेवली. त्यावेळी लोकसेवक क्र. २ हे तेथे कामकाज करत बसले होते. त्यानंतर लोकसेवक क्र. २ यांनी सदरची लाचेची रक्कम टेबलच्या ड्रावर मधून ताब्यात घेवून एका काळ्या रंगाच्या प्लॅस्टीक पिशवी मध्ये घालून टेबलच्या ड्रावरखाली असलेल्या कप्प्यात ठेवून आलोसे क्र. १ यांना लाच रक्कम स्विकारण्यास सहाय्यक केले म्हणून आलोसे क्र. १ व २ यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शक अधिकारी :— श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**
**श्री. भागवत सोनवणे सो, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
**संपर्क** - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
**संकेतस्थळ** - acbmaharastra.gov.in
**ईमेल** - १) acbwebmail@mahapolice.gov.in २) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
**ऑनलाईन तक्रार अर्ज** - **www.acbmaharastra.net.**
**टोल फ्रि. क्र. १०६४**

Scanned with OKEN Scanner